(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)

NAVJYOT /Vol. XII / Issue – I ISSN 2277-8063

# महात्मा गांधीजींचे शिक्षण विषयक विचार

**डॉ. संजय तुकाराम वाघमारे,** शंकरराव मोहिते महाविद्यालय, अकलूज

---

*** प्रस्तावना : -**

संपूर्ण जगाने त्यांना महात्मा, युगपुरूष म्हणून स्विकारून विसाव्या शतकातील अखिल मनुष्यजातीचे एकमेव प्रतिनिधी म्हणून मान्य केलेले आहे. आजच्या जगात भारताची ओळख गौतमबुध्दानंतर महात्मा गांधीचा देश म्हणूनच ओळखले जाते. मार्टीन ल्युथर किंगला त्यांच्या चळवळीचा आधार गांधीजी वाटतात. नेल्सन मंडेलांना गांधी हे त्यांच्या चळवळीची प्रेरणा वाटते. तर अमेरिकेसारख्या बलाढ्य देशाचा अध्यक्ष राहिलेल्या बराक ओबामांना गांधीमुळेच मी अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्ष होऊ शकलो असं वाटतं. आईन्स्टाईन सारख्या माणसाला गांधीसारखा हाडामासाचा माणूस प्रत्यक्षात या पृथ्वीतलावर होऊन गेला, यावर पुढील पिढी कदाचित विश्वास ठेवणार नाही अशी प्रतिक्रिया नोंदवावी वाटते.

भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात महात्मा गांधी यांचे योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण मोलाचे ठरते. 1920 नंतर भारतीय लढ्याचे नेतृत्व महात्मा गांधी यांच्याकडे आले. भारतीय स्वातंत्र्याचा लढा महात्मा गांधीच्या कार्याभोवती केंद्रभूत झाला. राष्ट्रपिता महात्मा गांधीजींच्या चिंतनातून हे युग गांधीयुग म्हणून ओळखले जाते. भारताच्या सामाजिक, राजकीय, आर्थिक व शैक्षणिक क्षेत्रात महात्मा गांधीजींनी आपल्या कार्याचा ठसा उमटविलेला आहे. प्रस्तुत शोध निबंधात 'महात्मा गांधीजींचे शिक्षण विषयक विचार' या विषयाची चिकित्सक मांडणी केली आहे.

*** महात्मा गांधी यांचे शैक्षणिक विचार : -**

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचे शिक्षणासंबंधीचे विचार क्रांतीकारक, मुलभूत आणि उपयुक्त आहेत. ते प्रचलित वर्ण-वर्ग प्रभावित शिक्षण व्यवस्थेस क्षीण करण्यास व व्यक्तीच्या बुध्दी, सृजनशीलता व कल्पनाशक्ती या मानसिक शक्तीचा विकास करण्यास उपयुक्त आहेत. ते लोकउपयोगी श्रमाला चालना देणारे व प्रतिष्ठा प्राप्त करून देणारे आहेत. व्यक्ती व समाजाचे चारित्र्य घडविण्यास उपयुक्त असलेले हे विचार व्यक्तीमध्ये कर्तव्यनिष्ठा व सेवावृत्ती रूजविण्यास सक्षम आहेत.

आपल्या समाजाचे वास्तव लक्षात घेऊन मांडलेले हे विचार सामाजिक स्थैर्यास व सामाजिक धारणेस मार्गदर्शक आहेत. म्हणून त्याचे शिक्षणासंबंधीचे विचार व्यवस्थित व गांभीर्याने समजून घेणे आवश्यक आहे. प्राचीन सुभाषित 'सा विद्या या विमुक्तचे' आजही तितकेच सत्य आहे. जितके आधी होते. इथे शिक्षणाचा अर्थ केवळ आध्यात्मिक शिक्षण असत नाही. विमुक्तीचा अर्थ मृत्यूनंतर मोक्ष असा ही नाही. मानवजातीच्या सेवेकरिता उपयोगी असलेल्या सर्व प्रकारच्या शिक्षणाचा ज्ञानात समावेश होतो आणि विमुक्ती म्हणजे सर्व प्रकारच्या पारतंत्र्यातून मुक्तता यात सध्याच्या परिस्थितीचाही समावेश आहे म्हणजे बाह्य सत्तेची गुलामगिरी आणि माणसाच्या कुशित गरजांची

गुलामगिरी यांच्यापासून मुक्ती याच आदर्शाच्या प्राप्ती करता करण्यात आलेले ज्ञानार्जन म्हणजे खरे शिक्षण[1]

*** उद्दिष्टे : -**

1) महात्मा गांधी यांच्या शैक्षणिक विचारांचा अभ्यास करणे.

2) महात्मा गांधी आणि स्त्रियांविषयी शैक्षणिक दृष्टीकोनावर प्रकाश टाकणे.

3) प्रौढ व बालशिक्षण विषयाबाबत भूमिका स्पष्ट करणे.

4) वर्धा शिक्षण योजनेचा अभ्यास तयार करणे.

5) भारतातील जनतेला उच्च शिक्षण मिळावे या दृष्टीकोनातून विद्यापीठाची स्थापना करणे.

6) स्वालंबी, स्वयंपूर्णता, चारित्र संपन्नता समाज शिक्षणातून निर्माण करण्याची भूमिका स्पष्ट करणे.

**1) नई तालीम किंवा वर्धा शिक्षण योजना** : -

22 व 23 ऑक्टोबर 1937 साली वर्धा येथे महात्मा गांधीच्या अध्यक्षतेखाली अखिल भारतीय राष्ट्रीय शिक्षण परिषद भरविण्यात आली.या परिषदेमध्ये डॉ. झाकीर हुसेन यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात आली. या समितीने जी योजना सादर केली तीच वर्धा शिक्षण योजना होय.[2]

वर्धा शिक्षण योजना म्हणजे खेड्यांतील मुलांना शिकवून त्यांना आदर्श ग्रामिक बनविणे हा या शिक्षणाचा उद्देश आहे. या शिक्षणाची योजना मुख्यत्वे त्यांच्यासाठीच केलेली आहे. या योजनेला मूळ प्रेरणा खेड्यातून मिळालेली आहे.[3] वर्धा शिक्षण हे मुले शहरांतील असोत किंवा खेड्यातील असोत त्यांचा भारतवर्षात ज्या काही सर्वात्तम व चिरस्थायी गोष्टी असतील त्यांच्याशी जुळवून देते. ते शरीर आणि मन दोहोंचा विकास साधते व मुलाला देशाच्या भूमीशी निगडीत राखते आणि त्याच्या मनुचक्षुपुढे भविष्यकाळाचे भव्यचित्र उभे करते. भविष्यकाळ निर्माण करण्याच्या कामी तो बालक किंवा बालिका आपल्या शालेय जीवनाच्या सुरूवातीपासून हातभार लावू लागतात.

वर्ण, जाती, व्यवस्थात्मक समाजातील शिक्षण पध्दतीचे हे सर्वात विषारी फळ होते. ते खुडून टाकल्याशिवाय जीवनाभिमुख शिक्षणाचा विकास होणे अशक्य होते. म्हणून महात्मा गांधीनी नई तालीम मध्ये श्रमनिष्ठा शिक्षणाला मध्यवर्ती स्थान दिले.[4]

**2) गुजरात विद्यापीठाची स्थापना : -**

महात्मा गांधीजींनी 1920 साली गुजरात विद्यापीठाची स्थापना केली. 'सा विद्या या विमुक्तचे' हे त्याचे बोधवचन निवडले गेले. 'मुक्त करत ते शिक्षण' या उक्तीत गांधीजींना सर्व प्रकारची मुक्तता अपेक्षित होती. सर्व प्रकारच्या दास्यातून, गुलामगिरीतून, परवशतेतून सोडविणारे शिक्षण त्यांना हवे होते. शिक्षणाने सर्वकष मुक्तकडे न्यावे याच ध्येयाने प्रेरित होवून गुजरात विद्यापीठाने सर्व स्तरावरील शैक्षणिक संस्था स्वत:च्या परिसरात चालविल्या.[5]

विश्वविद्यालयीन शिक्षणाच मुलभूत (बुनियादी) शिक्षणाशी समन्वय असला पाहिजे व तेही त्याच साच्यातून दिले गेले पाहिजे.[6] स्त्रियांना पुरूषांच्या बरोबरीच्या सोयी सवलती मिळाल्या पाहिजेत आणि जिथे आवश्यक असेल तिथे त्यांना विशेष सुविधा मिळालेल्या पाहिजेत.[7]

**3) स्त्री शिक्षणविषयक विचार : -**

समाजामध्ये स्त्रीचे स्थान महत्त्वपूर्ण आहे. स्त्री, पत्नी व माता, ह्या भूमिका पार पाडते. ह्यानुसार ती समाजाचा मुख्य गाभा आहे. शिक्षणाच्या बाबतीत स्त्री-पुरूष असा भेदभाव करू नये. स्रीयांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी त्यांना पुरूषाप्रमाणे शिक्षणाची संधी दिली पाहिजे. त्यांना त्यांचे कौटुंबिक व सामाजिक कर्तव्य त्यांना पार पाडता येतील. अशा प्रकारचे शिक्षण दिले जावे. त्यांच्या शिक्षणात अन्य विषयासोबत घर व्यवस्थापन, शिशू संगोपन आदि विषयांचा समावेश असावा असे त्यांचे मत होते. पण मुलींना सहशिक्षण द्यावे की नाही याचा निर्णय घेण्याचे त्यांनी पालकांना स्वातंत्र्य दिले होते. तरूणांनी हुंडाविरोधी धोरणाला स्वत:पासून सुरूवात करावी पुरूषांनी स्त्रीविषयी उदारमतवादी, समता न्यायाचा दृष्टीकोन स्विकारल्यास विधवा विवाहाचा प्रश्नदेखील सुटू शकतील असा त्यांचा ठाम विश्वास होता.[8]

**4) महात्मा गांधीजींचे प्रौढशिक्षणासंबंधी विचार : -**

गांधीजींनी प्रौढ शिक्षणासंबंधी मांडलेले विचार उपयुक्त आणि मार्गदर्शक आहेत. निरक्षतेमुळे अज्ञान निर्माण होते. अज्ञान हे आपल्या अनेक सामाजिक व राष्ट्रीय समस्यांचे मूळ आहे. अज्ञानामुळे व्यक्ती दैववाद, स्थितीवाद व संतुष्टवृत्ती वाढते. अज्ञानामुळे व्यक्तींना परकीय सत्ता व परकीय सत्तेपासून होणाऱ्या दृष्परिणामांची जाणिव होत नाही. त्याच्या वाट्याला विविध प्रकारचे पारतंत्र येते व ते दिर्घकाळ टिकते. दुर्बलतेमुळे पारतंत्र्य टिकते. दारिद्रयामुळे विषमता वाढते.[9]

महात्मा गांधीजींच्या मते प्रौढे शिक्षण म्हणजे प्रथम प्रौढांना खरे राजकीय शिक्षण तोंडाने देणे हे होय. प्रौढ शिक्षणात याची व्यवस्थित योजना करून ठेवलेली असली म्हणजे ते निर्भयपणे देता येईल मौखिक शिक्षणाच्याबरोबरच अक्षरज्ञानही देण्यात यावे. प्रौढांना विविध क्षेत्रातील ज्ञान मिळावे, आकडेमोड, भूगोल, इतिहास, आरोग्यशास्त्र भाषाविषयी ज्ञान, लिहणे, वाचणे इ. गोष्टीचे ज्ञान असले पाहिजे.[10]

स्वराज्याच्या निर्मितीसाठी लोक शिक्षण आवश्यक आहे. विद्यार्थांनी सुट्टीच्या काळात ग्रामीणभागात जाऊन प्रौढशिक्षणाचे कार्य करावे. ग्रामीण भागातील लोकांना शिक्षणाच्या चौकटीत आणावे. ही त्यामागची भूमिका असावी. इंग्रजी शिक्षण घेऊन आपण इंग्रजाचे गुलाम बनविले आहे. असे गांधीजीना वाटत असे आजच्या वर्तमान स्थितीतही प्रौढ शिक्षणाची आवश्यकता आहे. प्रौढशिक्षणाचा विकास व प्रचार करण्याकडे लक्ष देणे आवश्यक आहे.[11]

**5) बालशिक्षण व गांधीजी : -**

लहान मुलांना मुळाक्षरांची ओळख करून देताना शिक्षकाने तोंडी ज्ञान दिले तर त्याचा आर्थिक विकास होऊ शकेल. मुलांचे तोंडी ज्ञानामुळे त्यांचे व्यवहारिक ज्ञान वाढविणे सोपे जाईल. लहान वयापासूनच हस्ताक्षर चांगले असले पाहिजे. हा आग्रह गाधीजीचा होता. लहान मुलांचे शिक्षण हे स्त्रिया चांगल्या प्रकारे करू शकतात. बालशिक्षणात धार्मिक शिक्षण देण्याचा आग्रह गांधीजीचा होता. गांधीजीचे शैक्षणिक विचार विकासाच्या दिशेने नेणारे होते. इंग्रजी माध्यमाच्या शिक्षणाने विद्यार्थ्यावर मोठे संकट ओढले आहे. बालशिक्षणाची प्रगती व सुधारणा होण्यासाठी महात्मा गांधीजींनी सांगितलेल्या तत्वांचा व विचारांचा अवलंब करावा लागतो.[12]

**6) लैंगिक शिक्षण : -**

कामवासना ही एक उदात्त गोष्ट आहे. तिचा दुरूपयोग करणे हा मोठा गुन्हा आहे. किशोर वयातील मुला-मुलींना आपल्या प्रजनन विषयक अंगाचे महत्त्व आणि त्यांचा प्रयोग याबद्दलची माहिती अधिकारी व्यक्तीकडून द्यावी. लैंगिक शिक्षणाचे गांधीजींनी समर्थन केले आहे. कामभावनेला जिंकणे आणि तिचे उदात्तीकरण करणे. याशिक्षणामुळे मुलांच्या मनात स्वत: होऊन ही गोष्ट आली पाहिजे की माणूस आणि पशू यांच्यामध्ये एक भेद आहे. आणि तो हा आहे की निसर्गाने माणसाला विचार करण्याची आणि संवेदनशीलतेची शक्ती देऊन विशेष उपकृत केले आहे. लैंगिक शिक्षणामुळे काम वासनेवर जय मिळविता येतो. असे म्हटल्यास काही वावगे ठरणार नाही.[13]

**7) व्यावसायिक शिक्षण : -**

महात्मा गांधीजींनी व्यावहारिक शिक्षणावर भर दिला होता. कृती प्रधानतेमुळे कार्याच्या सर्वच क्षेत्रामध्ये कौशल्य निर्माण होते. स्वत:ची उपजीविका स्वत:ला करता यायला हवे आपण आत्मनिर्भर व्हावे. व्यावसायिक आणि औद्योगिक स्वरूपाचे शिक्षण प्राप्त करून दिले पाहिजे. शास्त्रीय दृष्टी जोपासत केलेल्या उत्पादक कामातून व्यक्तीस उत्तम दर्जाचे अनुबंध साधणारे सर्वांगीण शिक्षण मिळू शकते. असा गांधीजींचा विश्वास होता.[14]

**8) शिक्षकांविषयी गांधीजींचे विचार : -**

गांधीजींनी शिक्षणात शिक्षकालादेखील महत्त्वाचे व प्रतिष्ठेचे स्थान दिले आहे. शिक्षकाचा केवळ ज्ञानदान करणे हाच हेतू नसावा तर विद्यार्थ्यांपर्यंत सत्य, सहिष्णुता व सहानुभुति इ. तत्वे निर्माण करणे हे कार्य शिक्षकाचे असावे. शिक्षकच विद्यार्थ्यांचे खरेखुरे पाठ्यपुस्तक आहे. शिक्षक चारित्र्यसंपन्न, गुणवान, श्रध्दावान व प्रामाणिक असला पाहिजे. शिक्षणातून शिस्त निर्माण करता आली पाहिजे. शिक्षकाचा आदर्श विद्यार्थ्यांना असावा आजच्या शिक्षणपध्दतीत शिक्षकांविषयी आदर्श लोप पावत चाललेला दिसतो. केवळ पुस्तकी ज्ञानावर भर दिला जात असून दर्जेदार व वास्तविक, वस्तुनिष्ठ शिक्षण आज वर्तमान स्थितीत व चीतच पाहवयास मिळते. अध्यापन हा केवळ व्यवसाय नसून ते एक

व्रत आहे. शिक्षणप्रक्रिया यशस्वी करण्यासाठी पूर्ण जबाबदारी शिक्षकांवर असते. आज खऱ्या अर्थाने गांधीजीच्या शैक्षणिक कार्याचे स्मरण करणे महत्त्वपूर्ण ठरते.[15]

**9) शिक्षणाचे माध्यम: -**

गांधीजींच्या मतानुसार शिक्षणाचे माध्यम मातृभाषेतून असायला हवे. मातृभाषेतून कोणत्याही विषयाचे ज्ञान चांगल्याप्रकारे होऊ शकते. मातृभाषा आपल्या संस्कृतीचा अभिमान जागवयास सक्षम असते तसे परभाषेचे नाही. परकीय भाषेतून परकियांचे विचार संस्कारित होणार पुन्हा परकियांच्या गुलामगिरीचे संस्कार हवेत कशाला.[19] गांधीजींच्या शब्दात सांगायचे म्हणजे बालकावर इंग्रजी लादने म्हणजे त्याच्या नैसर्गिक विकासात बाधा आणणे होय. तसेच त्यांच्या मूळ रूपास नष्ट करण्यासारखे आहे.

*** उपसंहार : -**

1) महात्मा गांधी यांची शिक्षण व्यवस्था व शैक्षणिक विचार आजच्या वर्तमान स्थितीत स्विकारल्यास समाज परिवर्तन होण्यास मोठ्या प्रमाणात मदत होऊ शकते.

2) भारतातील जनतेला उच्च शिक्षण मिळावे याद्दष्टीकोनातून गुजरात विद्यापीठाची स्थापना करण्यात आली.

3) जीवनाभिमुख शिक्षणाचा विकास करण्यासाठी गांधीजीनी नई तालीम ध्येय, श्रमप्रतिष्ठा शिक्षणाला मध्यवर्ती स्थान दिले होते. थोडक्यात गांधीजींची शिक्षण प्रणाली ही व्यवसायभिमुख असल्याचे दिसून येते.

4) शारीरिक श्रम व श्रमप्रतिष्ठा या तत्वाना केंद्रास्थानी ठेवून समाजातील शोषण व केंद्रीकरण याच समूळ उच्चाटन करण्याच्या गांधीजींचा हेतू होता.

5) महात्मा गांधीजी यांचे शिक्षणासंबंधीचे विचार हे बहुजन केंद्री असून समाज उपयोगी असल्याचे दिसते.

6) गांधीजींची शिक्षणपध्दती ही भारतीय संस्कृतीला स्वावलंबी, सज्ञानी, सक्षम व सतेज बनविणारी होती.

7) गांधीजींचे शिक्षण विषयक विचार हे विद्यार्थीकेंद्री असून विद्यार्थ्यांचे हित जोपासणारे असल्याचे दिसते.

**संदर्भ साधने**

1) हरि - 103-1946, पृष्ठ 38.

2) पेंडके प्रतिभा सुधीर, जागतिक शिक्षणतज्ञ, विद्याप्रकाशन, नागपूर 2010, प्रथमावृत्ती पृ. क्र. 81.

3) आर. के. प्रभु आणि यु. आर. राव अनुवाद: ब्रिजमोहन हेडा, महात्मा गांधीचे विचार नवजीवन पब्लिसिंग हाऊस, अहमदाबाद पृ.क्र. 283.

4) हरि, 25-08-1946 पृष्ठ 283.

5) महात्मा गांधी - विकिपिडीया.

6) जाधव व्ही. के. आधुनिक भारताचा इतिहास, विद्या प्रकाशन, नागपूर सप्टें. 2004 पृ. क्र. 239

7) हरि, 5-8-1950 पृ. 195, आश्रम ॲक्टिव्हिटीज, 1932, अनु. बी. जी. देसाई.

8) कुंभार नागोराव, महात्मा गांधीजीचे सामाजिक तत्वज्ञान, अरूणा प्रकाशन, लातूर प्रथमावृत्ती, 02 ऑक्टो. 2012 पृ.क्र. 73.

9) तत्रैव पृ. क्र. 87.

10) तत्रैव पृ. क्र. 87-88.

11) केशव अंबादास लहाने, महात्मा गांधी यांचे समाजकेंद्री शैक्षणिक विचार आणि वर्तमान स्थिती Golden Research Thoughts Volume 3 issue 10 April 2014 Page 4.

12) तत्रैव पृ. क्र. 5.

13) पेंडके प्रतिभा सुधीर, जागतिक शिक्षणतज्ञ, विद्या प्रकाशन, नागपूर जानेवारी 2010, प्रथम आवृत्ती पृ. क्र. 92.

14) कुंभार नागोराव, महात्मा गांधीजीचे सामाजिक तत्वज्ञान, अरूणा प्रकाशन, लातूर प्रथमावृत्ती 02 ऑक्टोबर 2012 पृ. क्र. 71.

15) लुईफिशर मराठी अनुवाद: वि. रा. जोगळेकर, महात्मा गांधी: जीवन आणि कार्यकाळ साधना प्रकाशन दुसरी आवृत्ती 20 सप्टेंबर 2019.

16) डॉ. सदानंद मोरे, लोकमान्य ते महात्मा, राजहंस प्रकाशन, पुणे चौथी आवृत्ती डिसेंबर-2018.

17) रावसाहेब कसबे, गांधी (पराभूत राजकारणी आणि विजयी महात्मा) लोकवाड़मय गृह मुंबई, पहिली आवृत्ती ऑक्टोंबर-2020.

18) चंद्रकांत वानखडे, मनोविकास प्रकाशन, पुणे तृतीय आवृत्ती 5 फेब्रुवारी-2020.